सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 ☎2267 0210 /148/248,22102222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


### भाषा अधिकारी (हिंदी), भाषा संचालनालय, गट-ब

### धारिका क्रमांक : २२६१(२)/२०१३/दहा, जाहिरात क्रमांक : १३१ /२०११

आयोगामार्फत **भाषा अधिकारी (हिंदी), भाषा संचालनालय, गट-ब** पदावरील भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| अ. क्र. | एकूण पदसंख्या | | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा. प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण पदे - १ | | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | | महिला - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | | खेळाडू - | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | | अपंग - | -- | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. **२.२** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण-२००५/५७१/प्र.क्र.४८/०५/२०-ब, दि. ३ ऑक्टोबर, २००५ अनुसार प्रस्तुत पदासाठी अल्पदृष्टी/लो-व्हीजन, अंशत: कर्णबधिर व अस्थिव्यंग - एका पायाने अधू / एका हाताने अधू हे अपंग प्रवर्गातील **उमेदवार पात्र आहेत.**

**३. वेतनश्रेणी:**- रु.९,३०० -रु.३४,८०० + ग्रेड पे रु.४,४००/-, एकूण वित्तलब्धी अंदाजित रु.२४,७९७/-

**४. पात्रता:- ४.१** भारतीय नागरिक. **४.२ वय:-(१) दिनांक १ जानेवारी, २०१२** रोजी ३५ वर्षे, मागासवर्गीयांसाठी ४० वर्षे. (२) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही. (३) शासन आदेशानुसार माजी सैनिक व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील. (४) अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अपवादात्मक अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ३ वर्षांनी शिथिल करण्याविषयी, आयोगाने शिफारस केल्यानंतर शासनाकडून विचार करण्यात येईल. **४.३ शैक्षणिक अर्हता:- १)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची इंग्रजी व हिंदी हे विषय घेऊन व्दितीय श्रेणीतील पदवी **किंवा** इंग्रजी व हिंदी हे विषय घेऊन पदव्युत्तर पदवी **४.४** मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक **आणि ४.५ अनुभव:** ४.३ वरील अर्हता प्राप्त केल्यानंतर जबाबदारीच्या पदावरील हिंदीमधून अनुवाद करण्याचा किंवा हिंदीमधील प्रशासकीय कठीण शब्दांचा कोष (glossaries) तयार करण्याचा किमान तीन वर्षांचा अनुभव.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादी अर्हता व अनुभव किमान असून, किमान अर्हता व अनुभव धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे **निकष निश्चित करुन** अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. **चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही.** चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६. कर्तव्ये व जबाबदा-या :-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**८. शुल्क : (१)** मागासवर्गीय - रु.२१०/- **(३)** सदर शुल्क ऑनलाईन अर्जांची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. **(४)** बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑन लाईन पध्दतीने अचूकरित्या केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

**९. अर्ज करण्याची पध्दत-** (१) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. (२)पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ८ सप्टेंबर, २०११ ते दिनांक ८ ऑक्टोबर, २०११** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. (३)ऑनलाईन पद्धतीने अर्ज

सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल. (४)विहित पध्दतीने दोन्ही टप्यातील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transaction ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे. (५)ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवारांजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ सें.मी. x उंची ४.५ सें.मी) व स्वत:चा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:ची स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (६) बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर विहित पध्दतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच भरतीसंदर्भातील पुढील प्रक्रिया होऊ शकेल.

**१०.** विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ८ ऑक्टोबर, २०११ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. चलनाव्दारे विहित शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक १० ऑक्टोबर, २०११ पर्यन्त बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे** आवश्यक राहील.

**११.** चलनाव्दारे शुल्क बँकेमध्ये भरल्यानंतर बंकेकडून प्राप्त होणारा Transaction ID **दिनांक १२ ऑक्टोबर, २०११ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१२.** आयोगाने विहित केलेल्या पध्दतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या विहित पध्दतीने व विहित कालावधीत न करणा-या उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**प्र. ई. धबाले**
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुंबई :
दिनांक : **८ सप्टेंबर, २०११**